नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/06/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## पोलीस स्टेशन रामटेकची कार्यवाही

दिनांक २३/०६/२०२३ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ रामटेक उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुख्यबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे रामटेक हद्दीतील १८ किमी अंतरावर चाचेर रोड रामटेक येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची टिप्पर व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ टिप्पर क्र. एम. एच.– ४० ए. के.– ६७३५ च्या चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात टिप्पर चालक व **आरोपी नामे– शाम अमिलाल दशमेर, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३ हिवरा बाजार ता. रामटेक** हा टिप्परमध्ये अवैधरीत्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने त्याच्या ताब्यातून टिप्पर क्र. एम. एच.– ४० ए. के.– ६७३५ किमती अंदाजे १२,००,०००/– रू. यामध्ये अवैध्यरित्या विनापरवाना ४ ब्रास रेती किंमती अंदाजे १२,०००/– रू. ची एकुण किंमती अंदाजे १२,१२,०००/– रूपयाचा मुद्देमाल वाहतुक करतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– सरतर्फे पोशि शरद रविंद्र गिते, वय ३४ वर्ष, रा. पोस्टे रामटेक यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास परी. पोलीस उपनिरीक्षक कार्तिक सोनटक्के मो. नं. ९४०५९०३५२८ हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा तोंडाखैरी येथे दि. २१/०६/२०२३ चे २३/३० वा. ते दिनांक २२/०६/२०२३ चे ०५/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरेश नारायण काळे, वय ५७ वर्ष, रा. तोंडाखैरी ता. कळमेश्वर जि. नागपुर यांनी दिनांक २१/०६/२०२३ रोजी रात्री ११/३० वा. सुमारास त्यांचे घरासमोर असलेल्या टीनाच्या खुल्या शेडमध्ये त्यांनी आपल्या बकऱ्या बांधल्या होत्या. त्यानंतर ते झोपले असता त्यांच्याकडे असलेली एक बकरी काळया रंगाची वय ०३ वर्ष किंमती अंदाजे ११,०००/– रुपये, एक बकरी (पाठ) ढवळया रंगाची वय ०१ वर्ष किंमती ९,०००/– रुपये, एक बोकड पांढऱ्या रंगाचा वय ०१ वर्ष किंमती ११,०००/– रुपये असा एकुण किंमती ३१,०००/–रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मनोज गाढवे ब. नं. १६८५ पो.स्टे. कळमेश्वर हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. उमरेड** :– दिनांक २३/०६/२०२३ चे ११.०० वा. ते ११.३० वा. दरम्यान फिर्यादी हि आपल्या घरी हजर असतांना मागच्या दरवाज्यातुन फिर्यादी हि कपडे वाळत टाकत असलेल्या खोलीत यातील **आरोपी नामे– जितु वामन भोयर, वय ३५ वर्ष, रा. पिराया** हा आला ‘‘मला तुझाशी बोलायचे आहे’’ असे म्हणुन फिर्यादीला मागुन घट्ट पकडुन मिठी मारली त्यामुळे फिर्यादीला लज्जास्पद वाटल्याने फिर्यादी स्वत:ला सोडविण्यासाठी प्रयत्न करीत असतांना फिर्यादीने तिचे पतीला जोराने आवाज दिला असता आवाजाने घाबरून तो मागच्या दरवाज्याने पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३५४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक सुचित्रा मडावले पोस्टे उमरेड या करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत १९ किमी अंतरावर मौजा सातनवरी बस स्टॉप जवळ दिनांक २३/०६/२०२३ चे सकाळी ०७.१५ वा. दरम्यान फिर्यादीची आई **मृतक नामे–शांताबाई हरीश्चंद्र कोहळे, वय ७५ रा. खापा ता. सावनेर** हीचा मानलेला भाऊ नामे– अरूण चौधरी रा. सातनवरी यांना भेटण्याकरीता अडेगाव वरून सकाळी ०६.३० वा. दरम्यान आडेगाव ते नागपूर बसने सातनवरी येथे आल्यानंतर सातनवरी बस स्टॉप वर उतरून मानलेल्या भावाचे घरी जाण्याकरीता पायदळ नागपूर अमरावती महामार्ग रोड क्रॉस करत असता एका अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे आईला धडक देवुन अपघात केला. ज्यामुळे फिर्यादीची आईच्या हाताला छातीला व डोक्याला गंभीर मार लागल्याने मेडीकल कॉलेज, नागपुर येथे उपचारा दरम्यान मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिलीप हरीश्चंद्र कोहळे, वय ५६ रा. खापा ता. हिंगना जि. नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४(अ) भादवि. सहकलम १३४/१८४ मो.वा.का कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सुधीर राठोड मो. नं. ९९२२४२००२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर चनकापूर डब्ल्यू सी. एल. वर्कशॉप येथे दिनांक २३/०६/२०२३ रोजी दुपारी १३/०० वाजता फिर्यादीची मुलगी हिला पारशिवनी येथे सोडण्याकरिता पारशिवनी जाणाऱ्या बसमध्ये अण्णामोड येथून बसून पोटा येथे आपल्या घरी पायदळ रोडने जात असता मागून येणाऱ्या मोटरसायकल चालक **मृतक नामे– संजय सोमाजी कांबळे, वय ४० वर्ष, रा. चनकापुर कॉलनी हिल टॉप जवळ** फिर्यादी हिला मागून धडक मारून गंभीर रित्या जखमी केले व स्वत: रोडवर खाली पडून डोक्याला गंभीर मार लागून स्वत:चे मरणास कारणीभूत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३३७, ३३८, ३०४ (अ) भादवि. सहकलम १८४ मो.वा.का कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक जानुसिंग जाधव मो. नं. ९९२३१०४३१० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**